# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २१/०७/२०२५ (सोमवार)**

---

## रामटेक परीसरात वेश्या व्यवसाय चालविणाऱ्यांवर गुन्हा नोंद. एका पिडीतेची सुटका ,दोन आरोपी अटक

**पोलीस स्टेशन रामटेकः—** दि. २०/०७/२०२५ रोजी रामटेक पोलीसांना गुप्त बातमीदारकडुन खात्रीशीर माहिती मिळाली की, हॉटेल किंग लॉजिंग व बोर्डींग, किड्स कॉलेज रोड, रामटेक येथे येथे इसम नामे लोकेश डहारे हा स्वतःचे आर्थीक फायदयासाठी महीलांना पैश्याचे आमिष देवून देहव्यापार करण्यास प्रवृत्त करून रूम उपलब्ध करून देवून देहव्यापार करवुन घेत आहे. अशी माहीती मिळाल्याने हॉटेल किंग लॉजिंग व बोर्डींग येथे पोलीसांनी धाड टाकली असता **आरोपी नामे— १) लोकेश रामदास डहारे, वय ३६ वर्ष, रा. शनिवारी वार्ड, रामटेक ता. रामटेक हा हॉटेल चे काउंटरवर बसुन मिळाला.** पोलीसांनी पंचासमक्ष हॉटेलची झडती घेतली असता हॉटेल च्या **खोली क्रं २ मध्ये आरोपी क्रं २) विवेक विजय गुरूपंचाग, वय १९ वर्षे, रा वार्ड क्रं १ ,साटक, ता. पारशिवणी, जि. नागपुर ह.मु. वंजारी यांचे घरी किरायाने, बॅंक ऑफ महाराष्ट्र कोराडी, ता. कामठी, जि नागपुर आणि पिडीत महीला मिळुन आली.** आरोपी क्र. २) याला अधिक विचारपुस केली असता आरोपी क्रं १) **लोकेश रामदास डहारे याने त्याचे कडुन पैसे घेवुन त्याला हॉटेल मधील खोली क्रं २ आणि महीला उपलब्ध करून दिल्याबाबत महीती मिळाली. हॉटेल मधील नोंदणी रजिस्टर मध्ये आरोपी क्रं २) चे नाव नमुद केलेले नव्हते. पिडीतेला विचारपुस केली असता हॉटेल मालक आरोपी क्र ३) विशाल प्रकाशसिंग सोलंकी, रा रामटेक ता.रामटेक** याने पिडीत महीलेला फोन करून बोलाविले बाबत माहीती प्राप्त झाली. नमुद आरोपी हे मिळुन हे स्वतःच्या आर्थिक फायदयाकरिता महीलांना पैश्यांचे आमिष देवून देहव्यापार करण्यास प्रवृत्त करून जागा उपलब्ध करून देवुन त्यांच्याकडुन देहव्यापार करवुन घेत

असल्याबाबत दिसुन आले. पोलीसांनी घटनास्थळावरून ३ अॅड्रॉईड मोबाईलसह ,रोख रक्कम १००० /— रूपये आणि इतर साहीत्य असा २१,१६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच नमुद मिळुन आलेल्या पिडीतेची सुटका करण्यात आली आहे.

**आरोपी क्रं १) लोकेश रामदास डहारे, वय ३६ वर्ष, रा. शनिवारी वार्ड, रामटेक ता. रामटेक २) विवेक विजय गुरूपंचाग, वय १९ वर्षे, रा वार्ड क्रं ,साटक ता. पारशिवणी, जि. नागपुर ह.मु. वंजारी यांचे घरी किरायाने, बॅंक ऑफ महाराष्ट्र कोराडी, ता. कामठी जि नागपुर आणि ३) विशाल प्रकाशसिंग सोलंकी, रा रामटेक ता.रामटेक यांच्या विरूद्ध पोस्टे रामटेक येथे कलम ३,४, ५,७ स्त्रीया व मुली अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपी क्रं १ आणि २ यांना पोलीसांनी अटक केली आहे.**

## अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणा—या आरोपीतांवर ११ गुन्हे नोंद
## जलालखेडा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :— दिनांक २१/०७/२०२५ रोजी जलालखेडा पोलीसांना मौजा उमठा,पारधी बेडा येथे अवैध्यरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारे इसमाबाबत गोपनिय माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी मौजा उमठा पारधी बेडा येथे जावुन कार्यवाही केली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारे एकुण ०७ पुरूष आरोपी नामे १) प्रकाश माधवराव भोसले, वय ४५ वर्षे २) अजय शेरू भोसले, वय २७ वर्षे ३) बाबा सत्यम भोसले, वय ३३ वर्षे ४) राजेंद्र जर्नाधिन पवार, ४९ वर्षे ५) गाना रोहील घोसले, वय २५ वर्षे ६) जिगर जगदिश पवार, वय २५ वर्षे ७) दिनेश रामचंद्र बनसरे ,वय ३५ वर्षे आणि ८ महिला आरोपीचे ताब्यातुन १) ४५५ लिटर मोहाफुल गावठी दारू कि. ३१,०००/—रुपये, २) १९९० लिटर मोहाफुल सडवा कि. ६९,६५०/—रुपये, ३) २० नग देशी दारू निप किंमती १४००/— रुपये आणि ४) एक मोटर सायकल असा एकुण १,४२,०५०/— रुपयाचा मुददेमाल मिळुन आल्याने नाशवंत मुद्देमाल मोक्यावर पंचनामा कार्यवाही करुन नाश करण्यात आला आहे. नमुद पुरूष आणि

महिला आरोपी यांचे विरुध्द पोस्टे जलालखेडा येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये ११ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.



# रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक २०/०७/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक २१/०७/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. पोलीस स्टेशन पारशिवणी अंतर्गत पारशिवणी टाउन आणि दहेगाव जोशी येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले आणि शिवाजी चौक येथे नाकाबंदी केली. तसेच रामटेक उपविभागात सर्व पोलीस स्टेशनला कोबिंग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर कोबिंग ऑपरेशन श्री रमेश बरकते यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. हॉटेल लॉजेस चेक करण्यात आले. नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये स्थानिक पोलीस स्टेशन चे अधिकारी/अंमलदार यांच्या सोबत दंगा नियंत्रण पथक चे अंमलदार हजर होते.








VIJAY
TRADERS
BAJAJ
FINSERV
MH36Z5001

# केळवद मर्ग क्रं ११/२०२५

**पोलीस स्टेशन केळवद :—** येथे मर्ग क्र ११/२०२५ नोंद असुन यातील मृतक तेजस राजु जामगडे, वय २२ वर्षे, रा. वार्ड क्र २ कवठा ता. सावनेर २०/०७/२५ चे १२/३० वा मौजा कवठा शिवार येथे मृतक हा ठेक्याचे शेतात पिक फवारणी करीता विहीरीतुन पाणी काढत असता त्याच्या हातातील बकेट विहीरीत पडल्याने तो बकेट काढण्याकरीता विहीरीत उतरत असताना त्याच्या पाय घसरुन तोल गेल्याने विहीरीतील पाण्यात पडल्याने त्याला गावातील लोकांचा मदतीने बाहेर काढुन उपचारा कामी ग्रामीण रूग्णालय सावनेर येथे दाखल केले असता वैदयकीय अधिकारी यांनी तपासुन मृत घोषीत केले. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन केळवद येथे मर्ग दाखल केला आहे.

## महामार्गावरील धाब्यांवर अवैध दारू विक्री होत आहे अशा वृत्तपत्रातीत बातमी बाबत...

**पोलीस स्टेशन मौदाः—** दिनांक २१/०७/२०२५ रोजी एका वृत्तपत्रात हायवेवरील धाबे बनले बियरबार अशा मथळयाखाली बातमी प्रसीध्दी झाली आहे. त्या अनुषंगाने माहीती देण्यात येते की, पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत जानेवारी ते जुलै २०२४ च्या तुलनेत जानेवारी ते जुलै २०२५ मध्ये धाब्या वरील अवैध दारू विक्री कार्यवाही मध्ये ६९ टक्क्यांनी वाढ झाली आहे. संबधीत आस्थापनांचा परवाना रद्द करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**